MHST200013912020

# वि.दि.दा.क्र.२२३/२०२३ मधील निशाणी क्र.७९ वरील आदेश

वादीतर्फे वारस यांनी प्रस्तुतचा अर्ज वादीचे वारस अभिलेखावर घेण्यास परवानगी मिळण्यासाठी दाखल केला आहे.

२. अर्ज व म्हणणे अवलोकन केले. वादी व प्रतिवादींतर्फे विद्वान विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकण्यात आला.

३. वादीने सदरचा दावा जाहीर ठराव, हुकूमात्मक व निरंतर ताकीद मिळणेसाठी दाखल केला आहे. वादी हा दि.२६.१२.२०२० रोजी मयत झालेला आहे. प्रस्तुतचा अर्ज वादीचे वारस रेकॉर्डवर घेण्यासाठी दि.०२.१२.२०२१ रोजी दाखल केलेला आहे. सदर वारस अभिलेखावर घेण्याकरीता जवळपास एक वर्षाचा विलंब झालेला दिसुन येतो. परंतु, मार्च २०२० पासुन कोरोना संक्रमण असल्यामुळे सदर कालावधी मुदतीच्या कायदयातुन वगळण्याबाबत मा. सर्वोच्च न्यायालयाने निर्देश दिलेले आहेत. त्यामुळे, विलंब माफीचा अर्ज व अबेटमेंट सेट असाईडच्या अर्जाशिवाय वादीचा वारस अभिलेखावर घेण्याचा अर्ज मंजुर करणे क्रमप्राप्त आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे :

## आदेश

१) अर्ज मंजुर करण्यात येतो.

२) वादीचे वारस अभिलेखावर घेण्याची परवानगी देण्यात येते व अर्जात नमुद केलेप्रमाणे पुढील तारखेपर्यंत दुरुस्ती करुन दावा दुरुस्त प्रत अभिलेखावर दाखल करावी.

३) खर्चाबाबत आदेश नाही.

ANKUSH ATMARAM PACHARNE
Digitally signed by ANKUSH ATMARAM PACHARNE
Date: 2026.01.02 17:32:41 +0530

स्थळ : वाई. ( ए.ए.पाचरणे )

दिनांक :०१.०१.२०२६ सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर, वाई.